# सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका

# राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (आरोग्य विभाग)

## जाहिरात

महानगरपालिका कार्यक्षेत्रात डेंगी/चिकुनगुनिया प्रादुर्भाव दिसून येत आहे. यासाठी डेंगी/चिकुनगुनिया यांच्या नियंत्रणासाठी डासोत्पत्ती स्थाने तपासणीस Breeding Checkers ५ महिन्यांकरिता मनपा क्षेत्रात निव्वळ हंगामी तत्त्वावर खालील दर्शविलेनुसार नियुक्ती केली जाणार आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | पदाचे नाव | डासोत्पत्ती स्थाने तपासणीस Breeding Checkers (फक्त पुरुष उमेदवारांसाठी) |
| २ | पदसंख्या | २५ |
| ३ | शैक्षणिक अर्हता | किमान १० वी उत्तीर्ण |
| ४ | वयोमर्यादा | किमान १८ वर्षे आणि कमाल ४३ वर्षे |
| ५ | वेतन | दैनिक भत्ता दररोज रु.४५०/- प्रमाणे किमान २५ दिवस दरमहा रु.११,२५०/- |
| ६ | कामाचे स्वरुप | दैनंदिन गृहभेट देऊन कंटेनर तपासणी करुन डास अळी शोधणे Breeding Survey दररोज किमान २५० घरांची तपासणी करुन दूषित भांडी रिकामी करणे, सर्वेक्षण करताना सोबत १% डास अळीनाशक घेवून वापर करणे व इतर अनुषंगिक कामे. |
| ७ | उमेदवारांसाठी विषय सुचना | सदरची नेमणूक ही निव्वळ हंगामी व तात्पुरत्या स्वरुपात असून सदर सेवेचा मनपाशी संबंध असणार नाही. तसेच रु.१००/- मात्रच्या स्टँप पेपरवर विहित नमुन्यात करारपत्र करुन द्यावे लागेल. तसेच या पदावर काम केलेल्या कर्मचारी आरोग्य सेवा (पु.) या पदावर भरतीसाठी आवश्यक असलेले ९० दिवसांच्या कामकाजाचा अनुभव म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही किंवा उमेदवाराने केलेला कोणताही दावा मान्य केला जाणार नाही. |

### अटी व शर्ती

१. विहित नमुन्यातील अर्ज आरोग्य विभाग मुख्यालय येथे रु.१००/- इतके शुल्क भरुन उपलब्ध करुन घेणेचे आहेत.

२. उमेदवारांनी लेखी स्वरुपात विहित नमुन्यातील अर्ज - RCH कार्यालय, आपटा पोलीस चौकीजवळ, पाण्याच्या टाकीखाली उत्तर शिवाजीनगर सांगली येथे दि.१४/१०/२०२१ अखेर सायं. ५.३० पर्यंत सादर करुन सोबत शुल्क पावतीची छायांकित प्रत जोडणेची आहे.

३. सदरची नियुक्ती ही इयत्ता १० वीच्या प्राप्त झालेल्या गुणांक क्रमानुसार देण्यात येईल व समानगुण धारकांपैकी कमी वयाच्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४. नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना मे. कोर्टामध्ये दावा/हक्क सांगता देणार नाही तसेच त्यांचा मनपा सेवेशी कोणताही संबंध असणार नाही.

५. उक्त भरतीबाबत सर्व अधिकार मनपाने राखून ठेवलेला आहे.

(शिक्का)

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**सांगली, मिरज, कुपवाड शहर**
**महानगरपालिका.**